॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

अहिल्यानगर | सोमवार, दि. १ जून २०२६ | वर्ष ७ वे
अंक ८ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715



# आरसीबीचा सलग दुसऱ्यांदा आयपीएलवर कब्जा!

## गुजरातचा पराभव करून पुन्हा बनले चॅम्पियन

**● अहमदाबाद । वीरभूमी –** रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने (RCB) पुन्हा एकदा आयपीएलवर आपले वर्चस्व सिद्ध करत सलग दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावले आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या आयपीएल २०२६ च्या अंतिम सामन्यात गुजरात टायटन्सचा ५ विकेट्सने पराभव करून आरसीबीने इतिहास रचला. या विजयासह आरसीबी सलग दोन हंगाम आयपीएल ट्रॉफी जिंकणारा चेन्नई सुपर किंग्ज आणि मुंबई इंडियन्सनंतरचा तिसरा संघ ठरला.

सामन्यात गुजरात टायटन्सने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत १५५ धावांपर्यंत मजल मारली. वॉशिंग्टन सुंदरने नाबाद अर्धशतक झळकावून संघाचा डाव सावरला, मात्र आरसीबीच्या गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच अचूक मारा करत गुजरातच्या बलाढ्य फलंदाजीला रोखून धरले. रसिख सलाम दरने ३ बळी घेत निर्णायक भूमिका बजावली, तर भुवनेश्वर कुमार आणि जोश हेझलवूड यांनीही महत्त्वाचे बळी मिळवले.

१५६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना विराट कोहलीने पुन्हा एकदा मोठ्या सामन्यात आपली छाप सोडली. त्याने अवघ्या ४२ चेंडूत नाबाद ७५ धावांची शानदार खेळी करत संघाला विजयाच्या उंबरठ्यावर पोहोचवले. वेंकटेश अय्यरने सुरुवातीला आक्रमक ३२ धावांची खेळी केली, तर कर्णधार रजत पाटीदार आणि टिम डेव्हिड यांनीही उपयुक्त योगदान दिले. अखेरीस कोहलीनेच षटकार ठोकत विजयावर शिक्कामोर्तब केले आणि आरसीबीने १८ षटकांत १६१/५ अशी मजल मारली.

या विजयामुळे आरसीबीच्या चाहत्यांमध्ये जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या वर्षी पहिले आयपीएल विजेतेपद जिंकल्यानंतर यंदा त्यांनी ते यश कायम राखत आपले नाव आयपीएलच्या दिग्गज संघांच्या यादीत अधिक ठळकपणे नोंदवले आहे. विशेष म्हणजे, विराट कोहलीच्या नेतृत्व आणि अनुभवाचा संघाला मोठा फायदा झाला असून, अंतिम सामन्यातील त्याची खेळी पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरली आहे.

सामन्यानंतर कर्णधार रजत पाटीदार भावूक झाला. सलग दुसऱ्यांदा ट्रॉफी उंचावण्याचा आनंद शब्दांत व्यक्त करता येणार नाही, असे सांगत त्याने संपूर्ण संघ आणि चाहत्यांचे आभार मानले. दुसरीकडे, संपूर्ण हंगामात दमदार कामगिरी करणाऱ्या गुजरात टायटन्सला अंतिम सामन्यात अपेक्षित खेळ करता आला नाही आणि त्यांचे दुसरे विजेतेपदाचे स्वप्न अधुरे राहिले.

## SPOT NEWS

### पुढच्या १० दिवसांत शेतकऱ्यांना कर्जमाफी

**● अहिल्यानगर –** पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त चौंडी, अहिल्यानगर येथे आयोजित कार्यक्रमातील कृषिमंत्री दत्तात्रय भरणे बोलत होते. या भाषणात त्यांनी शेतकऱ्यांसाठी एक अत्यंत महत्त्वाची मोठी घोषणा केली आहे. कार्यक्रमात बोलताना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी जाहीर केले की, राज्य सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी जाहीर केली आहे. पुण्यश्लोक आहिल्यादेवी यांच्या नावाने यावर्षी शेतकऱ्यांची कर्जमाफी त्यांनी जाहीर केली आहे. येणाऱ्या आठ-दहा दिवसात अहिल्यादेवींच्या नावाने जे कर्ज माफी आहे येणाऱ्या दहा दिवसांमध्ये कर्जमाफी केली जाईल, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि सुनेत्रा वहिनी यांची परवानगी घेऊन मी आपल्या सगळ्यांना सांगतो असंही पुढे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी म्हटलं आहे.

### लाडकी बहीण योजनेत ८० लाख महिला अपात्र

**● मुंबई –** राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेबाबत मोठी माहिती समोर आली असून ई-केवायसी आणि कागदपत्र पडताळणीनंतर तब्बल ८० लाख महिला या योजनेसाठी अपात्र ठरल्याचे समोर आले आहे. त्यामुळे योजनेतील लाभार्थ्यांची संख्या २.४६ कोटींवरून थेट १.६६ कोटींवर आली आहे. सरकारी सूत्रांच्या माहितीनुसार, योजना सुरू राहणार असली तरी नव्याने नोंदणी करण्यास सध्या परवानगी दिली जाणार नाही. तसेच ई-केवायसीसाठी पुन्हा मुदतवाढ देण्याचाही सरकारचा कोणताही विचार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## केदारनाथ यात्रा थांबवली

**● देहराडून –** हिंदूंमध्ये चारधाम यात्रेला अनण्यसाधारण महत्व आहे. यंदाच्या वर्षी अक्षय तृतीयेला यात्रेला सुरूवात झाली होती. त्यामुळे भाविकांमध्ये मोठे आनंदाचे वातावरण होते. मात्र येथील बदलत्या नैसर्गिक परिस्थितीमुळे याचा यात्रेवर परिणाम होत असतो. हवामान विभागाने पुढील काही तासांत मुसळधार पाऊस, जोरदार वारे आणि वादळाची शक्यता व्यक्त केली आहे. संभाव्य धोका लक्षात घेऊन केदारनाथ धामाकडे जाणा-या भाविकांना विविध टप्प्यांवर आणि होल्डिंग क्षेत्रांमध्ये थांबवून सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात आले आहे.

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आणि हवामान विभागाने जारी केलेल्या ऑरेंज अलर्टच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून केदारनाथ यात्रा तात्पुरती स्थगित केली आहे. यात्रेकरूंच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत हा निर्णय घेण्यात आला आहे. प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, रुद्रप्रयाग जिल्ह्यातील विविध डोंगराळ भागांत सतत पाऊस सुरू आहे. हवामान विभागाने पुढील काही तासांत अतिवृष्टी, वेगवान वारे आणि वादळाचा इशारा दिला आहे. त्यामुळे केदारनाथ धामाकडे जाणाऱ्या भाविकांना विविध ठिकाणी थांबवून सुरक्षित निवाऱ्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

## मान्सूनचे आगमन लांबणार! पेरणीची घाई करु नये

**● मुंबई । वीरभूमी –** राज्यातील हवामानात सध्या मोठ्या प्रमाणात बदल होण्यास सुरुवात झाली आहे. मे महिन्यातील कडक उन्हाच्या झळांनंतर आता १ जून पासून सुरू होणाऱ्या नवीन आठवड्यात हवामानाचा नूर अधिकच बदलणार आहे. आता राज्यात अनेक भागांत वादळी पावसाची दाट शक्यता आहे. मात्र, हा पाऊस मान्सूनपूर्व असणार आहे.

बहुतांश भागांत किमान १० जूनपर्यंत अधिकृत मान्सूनच्या आगमनाची कोणतीही शक्यता नाही. कारण अद्याप केरळातही मान्सून दाखल झालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असे आवाहन हवामान खात्याने केले आहे.

हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार १ जूनपासून राज्यात विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि खानदेशात दुपारनंतर हवामानात मोठे बदल होऊन ढगाळ वातावरण निर्माण होईल. या भागात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. याशिवाय कोकण किनारपट्टीच्या भागातही काही प्रमाणात पावसाच्या सरी कोसळतील, असा अंदाज आहे. मात्र, आगामी काळात होणाऱ्या वादळी पावसाचा मान्सूनशी कोणताही थेट संबंध नाही. कारण मान्सून अद्याप केरळमध्येच दाखल झालेला नाही, असे हवामान खात्याने सांगितले.

शेतकऱ्यांनी १ जूनपासून सुरू होणाऱ्या केवळ मान्सूनपूर्व वादळी पावसावर अवलंबून राहून आपल्या शेतात पेरणीची घाई करू नये. मान्सूनचे अधिकृत आगमन होऊन पुरेसा पाऊस पडल्याशिवाय पेरणी केल्यास बियाणे वाया जाण्याची भीती असते. त्यामुळे घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

## अहिल्यादेवींच्या विचारांचा वारसा समाजाने अंगीकारण्याची गरज

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे । श्रीक्षेत्र चौंडीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा ३०१ वा जयंती महोत्सव

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या मूल्यांचा प्रसार अहिल्यादेवींनी आपल्या कार्यातून देशभर केला. त्यांनी अंधश्रद्धेला कधीही थारा दिला नाही आणि समाजाला योग्य दिशा दाखविण्याचे कार्य केले. त्यांच्या विचारांचा वारसा अंगीकारण्याची समाजाला गरज आहे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.




पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंती महोत्सवात उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. याप्रसंगी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार रामराव वडकुते, आमदार सर्वश्री काशिनाथ दाते, मोनिका राजळे, सुनील कर्जतकर, गोपीचंद पडळकर, विठ्ठलराव लंघे, किरण लहामटे, हेमंत ओगले, अमोल खताळ, अक्षय कर्डिले, उत्तमराव जानकर, नारायण पाटील, बाबासाहेब देशमुख, सचिन कांबळे, तसेच माजी मंत्री अण्णासाहेब डांगे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, आजचा दिवस ऐतिहासिक आहे. महाराष्ट्राचा अभिमान, शौर्य, त्याग व समर्पण यांचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे अहिल्यादेवी होळकर होत. चौंडीची माती त्यांच्या जन्माने पावन झाली आहे. त्या न्यायप्रियता आणि शक्तीचे प्रतीक होत्या. त्या युगप्रवर्तक होत्या. त्यांचा राज्यकारभार आदर्शवत होता. जनतेवर त्यांनी आईप्रमाणे माया केली. तीनशे वर्षांनंतरही देश त्यांचे स्मरण करत आहे. त्यांनी मानवधर्म जपला. अहिल्यादेवींनी अनेक वैयक्तिक आघात सहन केले; मात्र त्यातून खचून न जाता आदर्श राज्यकारभाराचा वस्तुपाठ घालून दिला. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे कार्य आपल्याला करायचे आहे. गोदा ते नर्मदा अहिल्यादेवी जलयात्रा शासनाने आयोजित केली. अहिल्यादेवी या दूरदृष्टी असलेल्या राज्यकर्त्या होत्या. त्यांनी समाजाच्या रक्षणासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले.

प्रास्ताविक विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री दत्तात्रय भरणे, खासदार रामराव वडकुते, आमदार गोपीचंद पडळकर आणि माजी मंत्री अण्णासाहेब डांगे यांनीही मनोगत व्यक्त केले.

# SPOT NEWS

## प्रा. डॉ. राजेश बाराते यांची महाराष्ट्र शासनाच्या मोडी तज्ज्ञ समितीवर नियुक्ती

**श्रीगोंदा । वीरभूमी–**



मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासनाने दि. २७ मे २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील इतिहास विभागाचे प्राध्यापक डॉ. राजेश बाराते यांची शासकीय मोडी लिपी लिप्यंतरकार व भाषांतरकार म्हणून राज्यस्तरीय नामिकेत निवड केली आहे. महाराष्ट्रातील ३० मोडी अभ्यासकांमध्ये त्यांचा समावेश करण्यात आला असून शासनाच्या विविध विभागांतील मोडी कागदपत्रांचे मराठी लिप्यंतर व इंग्रजी भाषांतर करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. डॉ. बाराते हे गेल्या १३ वर्षांपासून अध्यापन क्षेत्रात कार्यरत असून संशोधन, दुर्गसंवर्धन आणि मोडी लिपी प्रशिक्षण क्षेत्रातही त्यांचे उल्लेखनीय योगदान आहे. त्यांच्या या निवडीबद्दल विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## अकोले तालुक्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाची छापेमारी

**अकोले । वीरभूमी–**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने मा अधीक्षक, अहिल्यानगर यांच्या मार्गदर्शनाखाली अकोले तालुक्यातील अवैध दारू निर्मिती व विक्री केंद्रावर छापे घालण्यात आले. त्यामध्ये राजूर, वारंघुशी, खडकी, चांद सूरज, कारखाना रोड, आंबित, इंदोरी फाटा, सावरचोळ या ठिकाणी शोध घेतला. त्यामध्ये एकूण चार गुन्हे नोंदविण्यात आले असून तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. आणि मुंबई दारूबंदी कायद्याखाली ४१८६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यापुढे या ठिकाणी कारवाई करून या अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यात येणार आहे. सदर कार्यवाही मध्ये भरारी पथक २ व निरीक्षक कोपरगाव विभागाचे श्री. गायकवाड व श्री. मालवेकर यांनी पुढाकार घेवुन कार्यवाही केली आहे.

## नगर शहरात घरासमोरून स्कॉर्पिओ एन चोरीला

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

शहरातील बालिकाश्रम रोड परिसरातून घरासमोर उभी केलेली महिंद्रा स्कॉर्पिओ एन अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. यामुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. हिमांशू अमरेंद्र सिंग (वय २४) हे महालक्ष्मी उद्यानाजवळील राजलक्ष्मी बंगल्यात वास्तव्यास आहेत. त्यांनी त्यांच्या वडिलांच्या नावावरील काळ्या रंगाची स्कॉर्पिओ एन (यूपी ३२ क्यूजे ३७२७) घरासमोर लॉक करून उभी केली होती. मात्र २१ मे रोजी सकाळी कामावर जाण्यासाठी बाहेर आल्यानंतर वाहन जागेवर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. परिसरात शोध घेऊनही वाहनाचा मागमूस लागला नाही. विशेष म्हणजे वाहनातील जीपीएस यंत्रणाही बंद असल्याने चोरट्यांनी नियोजनपूर्वक चोरी केल्याचा संशय व्यक्त होत आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

## दक्षिण काशी श्रीक्षेत्र पुणतांबा येथील

# ऐतिहासिक होळकर घाटाच्या पुनर्बांधणीसाठी निधी द्या

### ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांची मागणी

**कोपरगाव । वीरभूमी –**

विधानसभा मतदारसंघातील दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र पुणतांबा येथील गोदावरी नदीवरील ऐतिहासिक होळकर घाटाच्या पुनर्बांधणीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन त्यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील श्रीक्षेत्र पुणतांबा हे दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेले प्राचीन तीर्थक्षेत्र आहे. शिर्डीपासून सुमारे १६ किलोमीटर अंतरावर वसलेले हे गाव गोदावरी नदी येथे उत्तरवाहिनी होत असल्याने विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. वैदिक काळापासून ऋषी–मुनींनी येथे तपश्चर्या केली असून पुण्यप्राप्ती व मोक्षप्राप्तीसाठी काशीनंतर पुणतांब्याला विशेष महत्त्व असल्याची श्रद्धा आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी गोदावरी नदीकाठी सन १७६५ ते १७९५ या कालावधीत भव्य होळकर घाट उभारला तसेच परिसरातील अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला. गावातील अहिल्यादेवींनी बांधलेला वाडा आजही अस्तित्वात असला तरी तो जीर्ण अवस्थेत आहे. गोदावरी तटावरील धार्मिक परंपरा आणि भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता होळकर घाटाचे ऐतिहासिक महत्त्व अधिक अधोरेखित होते.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, पुणतांबा हे प्रख्यात संगीतकार सी. रामचंद्र (रामचंद्र नरहर चितळकर) यांचे जन्मगाव आहे. साईबाबांच्या आरत्या व भजनांचा समावेश असलेली पहिली ध्वनिमुद्रिका प्रसिद्ध करण्याबरोबरच भारतरत्न लता मंगेशकर यांना ए मेरे वतन के लोगो या अजरामर गीतासाठी संधी देण्याचे श्रेय त्यांना जाते. त्यामुळे पुणतांबा हे धार्मिकतेबरोबरच सांस्कृतिक व ऐतिहासिक वारशाचेही केंद्र आहे.

गोदावरी तटावर होळकर घाटासह ब्राह्मण घाट आणि विठ्ठल घाट असे तीन प्रमुख घाट आहेत. परिसरात विविध देवदेवतांची मंदिरे असून धार्मिक विधी, अस्थी विसर्जन आणि इतर संस्कारांसाठी राज्यभरातून भाविक येथे मोठ्या संख्येने येतात. त्यामुळे या ऐतिहासिक वारशाचे संवर्धन करण्यासाठी होळकर घाटाची पुनर्बांधणी करणे अत्यावश्यक आहे.

त्यामुळे श्रीक्षेत्र पुणतांबा येथील ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या दृष्टीने होळकर घाटाच्या पुनर्बांधणीसाठी विशेष निधी उपलब्ध करून संबंधित विभागांना आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे केली आहे.

## आनंदगडच्या अक्युपंक्चर डिप्लोमा अभ्यासक्रमासाठी प्रवेश सुरू

**अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुक्यातील वीरगाव येथील आनंदगड शैक्षणिक संकुलामध्ये सुरू असलेल्या मातोश्री गंगूबाई शिंदे अक्युपंक्चर कॉलेजच्या ‘डिप्लोमा इन अक्युपंक्चर थेरपी’ या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून या दोन वर्षीय अभ्यासक्रमाला विद्यार्थ्यांची चांगली पसंती मिळत आहे.

दोन वर्ष कालावधीचा हा अभ्यासक्रम महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग तसेच महाराष्ट्र अक्युपंक्चर कौन्सिल यांच्या मान्यतेने राबविण्यात येत आहे. बारावी उत्तीर्ण असलेल्या कोणत्याही शाखेतील विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला जातो. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करता येतो किंवा वैद्यकीय क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध होतात, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र तासकर यांनी दिली.

या अभ्यासक्रमाचे संस्थेतील हे तिसरे वर्ष असून मागील दोन्ही वर्षांत पूर्ण क्षमतेने प्रवेश झाले होते. शासनमान्य पदविका असल्यामुळे अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना स्वतंत्र व्यवसाय सुरू करण्याची संधी उपलब्ध होते.

अक्युपंक्चर ही औषधविरहित उपचारपद्धती असल्याने अनेक रुग्णांचा या उपचारपद्धतीकडे कल वाढत आहे. २०१५–१६ पासून अक्युपंक्चर परिषद अस्तित्वात आल्यानंतर २०२३–२४ पासून राज्यभरात अक्युपंक्चर थेरपीची नवीन महाविद्यालये सुरू झाली आहेत. त्यामुळे या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद दिसून येत असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे आणि सचिव डॉ. अनिल रहाणे यांनी दिली.

## आक्षेपार्ह सोशल मीडिया पोस्टप्रकरणी डॉक्टरवर पारनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबतच्या वादग्रस्त पोस्टमुळे भावना दुखावल्या

**पारनेर । वीरभूमी–**

सोशल मीडियावर केलेल्या कथित आक्षेपार्ह पोस्टमुळे सामाजिक आणि धार्मिक भावना दुखावल्याच्या आरोपावरून पारनेर पोलीस ठाण्यात एका डॉक्टरविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ च्या कलम २९९ अंतर्गत हा गुन्हा नोंदविण्यात आला असून या घटनेमुळे तालुक्यात संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

याप्रकरणी संकेत विनायक पटेकर (वय २४, रा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, भाळवणी, ता. पारनेर) यांनी पारनेर पोलीस ठाण्यात लेखी फिर्याद दाखल केली आहे. संकेत पटेकर हे वंचित बहुजन आघाडीचे पारनेर तालुका युवक अध्यक्ष आहेत.

फिर्यादीनुसार, डॉ. मंगेश दत्तात्रय बेकारसे (रा. खारे कर्जुने, ता. जि. अहिल्यानगर) हे भाळवणी येथे वैद्यकीय व्यवसायानिमित्त वास्तव्यास आहेत. २१ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास त्यांनी फेसबुकवर एक वादग्रस्त पोस्ट केल्याची माहिती फिर्यादीला मिळाली.

सदर पोस्टमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक पात्रता, लंडनमधील वास्तव्यासंबंधी बाबी तसेच स्वातंत्र्यलढ्यातील योगदानासंदर्भात आक्षेपार्ह आणि बदनामीकारक स्वरूपाचा मजकूर प्रसिद्ध करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच बहुजन समाजाचे नेते काशीराम यांच्याबाबतही कथितरीत्या आक्षेपार्ह टिप्पणी करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

ही पोस्ट सोशल मीडियावर प्रसारित झाल्यानंतर वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. आरोपीने जाणीवपूर्वक आणि दुष्ट हेतूने हा मजकूर प्रसिद्ध करून समाजाच्या धार्मिक व सामाजिक भावना दुखावल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

तक्रारीची दखल घेत पारनेर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २९९ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पारनेर पोलीस करीत आहेत.

दरम्यान, या प्रकरणात नोंदविण्यात आलेले आरोप हे फिर्यादीच्या तक्रारीवर आधारित असून संबंधित आरोपांची सत्यता तपास यंत्रणांकडून पडताळली जाणार आहे.

## बनावट गोळीबार प्रकरणाचा छडा लावणाऱ्या पोलीस दलाचा शिवसेनेकडून गौरव

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

शहरातील पाईपलाईन रोड परिसरातील तुळजाभवानी मंदिराजवळील पुणेरी अमृततुल्य चहाच्या दुकानासमोर घडलेल्या कथित गोळीबार आणि हल्ला प्रकरणाचा पर्दाफाश करून फिर्यादीच या कटाचा मुख्य सूत्रधार असल्याचे उघड करणाऱ्या पोलीस दलाचा शिवसेनेच्या वतीने गौरव करण्यात आला. पोलीस अधीक्षक कार्यालयात उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे, पोलीस निरीक्षक जगदिश भांबळ, पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर यांच्यासह तपास पथकातील अधिकाऱ्यांचा व कर्मचाऱ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले, शहरप्रमुख संभाजी कदम, नगरसेवक दत्तात्रय कावरे, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे, शंकर शेळके, अशोक शेळके, सागर गलांडे, शिवराज गलांडे, प्रवीण गीते यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहरातील पाईपलाईन रोड परिसरातील तुळजाभवानी मंदिराजवळील पुणेरी अमृततुल्य चहाच्या दुकानासमोरील गोळीबार आणि हल्ला प्रकरणाने काही दिवसांपूर्वी शहरात खळबळ उडवून दिली होती. मात्र, पोलीसांनी अत्यंत बारकाईने आणि तांत्रिक तपासाच्या आधारे या प्रकरणाची उकल केली. तपासादरम्यान फिर्यादी चिरंजीव गाढवे यानेच स्वतःवर हल्ला घडवून आणण्यासाठी सुपारी देत बनावट गुन्ह्याचा कट रचल्याचे निष्पन्न झाले आहे. या कटामागे युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे यांना गुन्ह्यात अडकविण्याचा प्रयत्न असल्याचेही तपासात समोर आले. मात्र, पोलीसांच्या निष्पक्ष आणि सखोल तपासामुळे सत्य बाहेर आले आणि हा कथित कट उधळून लावण्यात यश आले. याबद्दल शिवसेनेच्या वतीने पोलीस दलाचे आभार व्यक्त करण्यात आले.

या प्रकरणाचा तपास करणाऱ्या पोलीस पथकातील पोलीस हेड कॉन्स्टेबल नितिन उगलमुगले, अरुण गांगुर्डे, भानुदास खेडकर, अब्दुलकादर इनामदार, सुधीर खाडे, सुरज वाबळे तसेच पोलीस कॉन्स्टेबल सुमित गवळी, शाकीर सय्यद, अविनाश बर्डे, सतिष त्रिभुवन, सुजय हिवाळे, सतिष शिंदे, बाळासाहेब भापसे, कपिल गायकवाड आणि भागवत बांगर यांचाही सत्कार करण्यात आला. शहरात कुठेही मारहाणीची घटना घडली की गंभीर दुखापतीचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी काही ठरावीक हॉस्पिटलमध्ये धाव घेतली जाते, असा गंभीर आरोप शिवसेनेने केला आहे.

## मिडसांगवी येथे गावठी दारू निर्मितीवर पोलिसांचा छापा

### एक ड्रम गावठी दारू सह २०० लिटर गावठी दारूचे रसायन केले नष्ट

**पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी तालुक्यातील मिदसांगवी येथे गावठी हातभट्टी दारू निर्मिती व विक्रीसाठी साठवून ठेवलेल्या साहित्यावर पोलिसांनी छापा टाकून सुमारे २१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी लक्ष्मण गायकवाड विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मिडसांगवी परिसरात गावठी हातभट्टी दारू तयार करून विक्री केली जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना प्राप्त झाली होती. त्यानुसार पोलिस पथकाने पंचांसमक्ष संबंधित ठिकाणी छापा टाकला. छाप्यामध्ये एका घराच्या मागील बाजूस गावठी दारू निर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य तसेच तयार दारू आढळून आली.

कारवाईदरम्यान सुमारे पाच लिटर तयार गावठी हातभट्टी दारू व दारू तयार करण्यासाठी वापरले जाणारे सुमारे २०० लिटर रसायन जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची अंदाजे किंमत २१ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.



पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून नमुने तपासणीसाठी राखून ठेवले असून उर्वरित साहित्य नष्ट करण्यात आले. या प्रकरणी संबंधित व्यक्तीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमातील कलम ६५ (ई) व ६५ (फ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढील तपास पाथर्डी पोलिसांकडून सुरू असून अवैध मद्यनिर्मिती व विक्रीविरोधातील कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले. ही कारवाई सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रविंद्र लबडे, राजेंद्र म्हस्के व पोलीस कर्मचारी आसाराम बटुळे यांच्या पथकाने यशस्वी केली.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## प्रा. चंद्रशेखर हासे यांची पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या राज्य संघटकपदी नियुक्ती

**अकोले । वीरभूमी–**

महाराष्ट्रभर पर्यावरण संरक्षणाच्या कार्यात अग्रेसर असलेल्या निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या राज्य संघटकपदी प्रा. चंद्रशेखर हासे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संस्थेचे राज्याध्यक्ष प्रमोद मोरे तसेच संस्थेच्या कोअर कमिटीने त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली. स्वर्गीय आबासाहेब मोरे यांनी स्थापन केलेली निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ ही संस्था पद्मभूषण अण्णा हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध पर्यावरणपूरक उपक्रम राबवत आहे. पर्यावरण संरक्षणासाठी संस्था वनसंवर्धन, वृक्षारोपण, जंगलातील वणवे रोखणे, पशुपक्ष्यांसाठी आश्रय, चारा व पाण्याची व्यवस्था करणे तसेच पर्यावरणाबाबत समाजात जनजागृती निर्माण करणे अशा विविध उपक्रमांचे राज्यभर आयोजन करते. संस्थेची राज्य कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून, त्यामध्ये प्रा. चंद्रशेखर हासे यांच्यावर राज्य संघटक म्हणून महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल राज्याध्यक्ष प्रमोद मोरे, कोअर कमिटी सदस्य प्रा. महेश पाडेकर, शिक्षक भारती संघटनेचे जिल्हा समन्वयक विजय पांडे, प्रवीण मालुंजकर आदींसह विविध स्तरांतील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त हरदिनचे वृक्षारोपण

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. तसेच अध्यात्म, समाजप्रबोधन आणि महिला सक्षमीकरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ह.भ.प. पूजाताई आळकुटे–माने यांना 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्तृत्ववान महिला गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. याच कार्यक्रमात छावणी परिषदेचे वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक रमेश साके यांच्या सेवानिवृत्तीबद्दल विशेष सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाच्या प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा, विजय माने, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, माधवी माळगे, मीनाताई परदेशी, रजनी ताई परदेशी, प्रांजली सपकाळ, शितलताई भापसे, जहीर सय्यद, रमेश वराडे, सर्वेश सपकाळ, दिलीप ठोकळ, अशोक पराते, ताराचंद ठोकळ, अनिल हळगावकर, अभिजीत सपकाळ, जालिंदर आळकुटे, मुन्ना वाघस्कर, निजाम पठाण, नवनाथ वेताळ, विलास आहेर, मनोहर दरवडे, ओम माळगे, सुधीर कपाळे, दीपक घोडके, अविनाश जाधव, अविनाश पोतदार, शेषराव पालवे, रामनाथ गर्जे, सरदारसिंग परदेशी, राजू जंगम, शशिकांत पवार, दशरथ मुंडे, योगेश चौधरी, कुमार धतुरे, प्रकाश देवळालीकर, विनोद खोत, दीपक बडदे, सुनील बग्गन, विशाल भामरे, नवनाथ खराडे, बाळासाहेब धाडगे, विजय महाजन, सेंट्रल बँकेचे अमित देशमुख, शितल भापसे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना संजय सपकाळ यांनी सांगितले की, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी आदर्श राज्यकारभार उभा करून न्याय, धर्मनिष्ठा आणि लोककल्याणकारी प्रशासनाचा आदर्श निर्माण केला. महिलांनी कोणत्याही क्षेत्रात प्रामाणिकपणे कार्य केल्यास त्या सर्वोच्च यश संपादन करू शकतात, हे अहिल्यादेवींनी आपल्या कार्यातून सिद्ध केले. आजच्या काळात महिलांचे योगदान प्रत्येक क्षेत्रात वाढत असून त्यांचा सन्मान करणे ही समाजाची जबाबदारी आहे. त्या भावनेतून दरवर्षी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना दरवर्षी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्तृत्ववान महिला गौरव पुरस्कार' देण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

# शहराचा विकास आपल्या कुटुंबाप्रमाणे करण्यासाठी कटिबद्ध

### नगराध्यक्ष अभय आव्हाड । पाथर्डी नगरपरिषदेचा ४१ वा स्थापना दिन उत्साहात साजरा

**पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी शहरात सुमारे चार दशकांपूर्वी नगरपरिषदेची स्थापना झाली. शहराच्या जडणघडणीत अनेकांनी मोलाचे योगदान दिले असून, विविध पदाधिकाऱ्यांनी व लोकप्रतिनिधींनी दूरदृष्टी ठेवून शहराचा विकास साधला. शहराच्या विकासाबरोबरच सामाजिक सलोखाही जपला गेला. माजी आमदार, खासदार आणि पालकमंत्र्यांनी शहराच्या विकासासाठी मोठे सहकार्य केले. सध्या आमदार मोनिका राजळे यांच्या नेतृत्वाखाली शहर विकासाची अनेक कामे सुरू असून शासनाच्या विविध योजनांमधून भरीव निधी उपलब्ध होत आहे. शहराचा विकास आपल्या कुटुंबाप्रमाणे करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे प्रतिपादन नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी केले.




पाथर्डी नगरपरिषदेचा ४१ वा स्थापना दिन शनिवारी (दि. ३० मे) नवीन नगरपरिषद कार्यालयाच्या सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. ३० मे १९८५ रोजी स्थापन झालेल्या नगरपरिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त पालिका कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांच्या पथकाकडून सुमारे ८० कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. कार्यक्रमात विविध मान्यवरांचा सत्कार तसेच नगरपरिषदेत सेवा बजावून अन्यत्र कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर उपनगराध्यक्षा मंगल कोकाटे, ज्येष्ठ नगरसेवक नंदकुमार शेळके, माजी उपनगराध्यक्ष बजरंग घोडके, सभापती बंडूशेठ बोरुडे, सुभाष बोरुडे, संजय देशमुख, डॉ. जगदीश मुने, प्रतीक नांगरे, गटनेते देवा पवार, संजय भागवत, वंदना टेके, किरण खेडकर, मनीषा उदमले, ज्योती पवार, सविता भापकर, मंगल सोनटक्के, रेखा हंडाळ, मुख्याधिकारी संतोष लांडगे यांच्यासह नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमात नगरसेविका सविता भापकर व इतर मान्यवरांनी नगरपरिषदेच्या ४१ व्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देताना विद्यमान पदाधिकारी, नगरसेवक आणि अधिकाऱ्यांनी पालिकेचा कारभार अधिक पारदर्शी व लोकाभिमुख करण्यासाठी प्रयत्नशील राहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

वर्धापन दिनानिमित्त पत्रकार, माजी नगरसेवक राधाकिसन सबलस, सोमनाथ गर्जे, दत्तात्रय टेके, सुरेश शेटे तसेच स्वच्छता कर्मचारी काळू पवार यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

यावेळी उपनगराध्यक्षा मंगल कोकाटे आणि माजी उपनगराध्यक्ष बजरंग घोडके यांनी मनोगत व्यक्त करताना नगरपरिषद स्थापनेपासूनच्या इतिहासातील आठवणींना उजाळा दिला. शहराच्या विकासासाठी योगदान देणाऱ्या सर्वांचे त्यांनी आभार मानले. नागरिकांच्या सहकार्याने शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि सुविधायुक्त करण्यासाठी नगरपरिषद सातत्याने प्रयत्नशील राहील. लोकसहभागातून विकासकामांना गती देऊन आमदार मोनिका राजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पाथर्डीला आदर्श शहर बनविण्याचा संकल्प असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक करताना मुख्याधिकारी संतोष लांडगे म्हणाले की, नगरपरिषद स्थापन होण्यापूर्वी पाथर्डी, शिरसाटवाडी, तनपुरवाडी आणि हंडाळवाडी या भागांची संयुक्त ग्रामपंचायत अस्तित्वात होती. १९८५ ते १९९० या कालावधीत प्रशासकांकडे कारभार होता. त्यानंतर १९९१ मध्ये सुभाष घोडके हे पहिले नगराध्यक्ष झाले. त्यांच्या कार्यकाळात विकासकामांचा मजबूत पाया रचला गेला. त्यानंतर नगरपरिषदेने टप्प्याटप्प्याने प्रगती करत विकासाचा वेग कायम राखला आहे.

यावेळी आजिनाथ मोरे, बाळासाहेब सोनटक्के, बबन सबलस, संदीप पवार, किशोर परदेशी, कार्यालयीन प्रमुख विशाल डहाळे, विशाल मडवई, सोमनाथ नारळकर, कृष्णा देवढे, अशोक डोमकावळे, अंबादास साठे, संजय खोर्दे, किशोर पारखे, शुभम काळे, विजय जाधव, दशरथ हंडाळ, नंदकुमार गोला, अरुण सोनटक्के, पंकज पगारे, हरीभाऊ भालेराव, सोमनाथ घोरपडे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याधिकारी संतोष लांडगे यांनी केले. सूत्रसंचालन अनिल कोळगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन किशोर पारखे आणि अशोक डोमकावळे यांनी मानले.

## लाल बहादूर शास्त्री विद्यालयाच्या १९९४-९५ बॅचचा स्नेहमेळावा उत्साहात



**श्रीगोंदा । वीरभूमी–**

टाकळी कडेवळीत (ता. श्रीगोंदा) येथील लाल बहादूर शास्त्री विद्यालयाच्या सन १९९४–९५ च्या दहावी बॅचचा 'गेट–टुगेदर २०२६' स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. तब्बल ३१ वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी शालेय आठवणींना उजाळा देत गुरुजनांचा सन्मान केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षक जनार्धन जायकर सर होते. यावेळी दिवंगत शिक्षक व विद्यार्थ्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या संरक्षण भिंतीच्या कामासाठी २५ हजार रुपयांची देणगी दिली. तसेच एसएससी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी, एनएमएमएस शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी व पालकांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी माजी व विद्यमान शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिगंबर भुजबळ यांनी, प्रास्ताविक रमेश शेलार यांनी तर आभार प्रदर्शन शिवाजी सोनवणे यांनी केले. स्नेहभोजन व समूह छायाचित्रणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## हभप. सावित्राआई माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक बाबासाहेब वैद्य यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा उत्साहात

**अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीच्या श्रेष्ठींनी नेहमीच चार भिंतींच्या आतील शिक्षणाबरोबर माणूस घडविण्याला प्राधान्य दिले. संस्थेचे मुख्याध्यापक म्हणून बाबासाहेब वैद्य यांनीही हाच वारसा पुढे चालविला, हीच संस्थेची खरी जमेची बाजू असल्याचे गौरवोद्गार संस्थेचे माजी अध्यक्ष, विश्वस्त दशरथराव सावंत यांनी काढले.




अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीच्या हभप सावित्राआई माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक बाबासाहेब किसनराव वैद्य यांच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हभप विष्णुपंत वैद्य होते.

यावेळी संस्थेचे कायम विश्वस्त गिरजाजी जाधव, ताम्हाणे आण्णा, जे. डी. आंबरे, एस. पी. देशमुख, संस्थेचे अध्यक्ष इंजि. सुनील दातीर, सचिव सुधाकरराव देशमुख, यशवंतराव आभाळे, शरदराव देशमुख, रमेशराव जगताप, दशरथ आरोटे, रामनाथ आरोटे, सुधाकरराव आरोटे, संपतराव नाईकवाडी, ॲड. के. बी. हांडे, शिक्षणाधिकारी एस. पी. मालुंजकर, हभप. दत्तात्रय महाराज आवारी, अरुण महाराज फरगडे, मुख्याध्यापक आर. टी. सोनवणे, माजी मुख्याध्यापक एम. डी. बंगाळ, दिलीप रोंगटे, केंद्रप्रमुख बाळासाहेब आरोटे, माजी प्राचार्य विद्याचंद्र सातपुते, यशवंतराव आरोटे, पत्रकार विजयराव पोखरकर, बंधू शिवाजी वैद्य, संभाजी वैद्य, बाळासाहेब तोरमल यांच्यासह संस्थेच्या सर्व विद्यालयांचे आजी–माजी मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ, नातेवाईक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

दशरथराव सावंत पुढे म्हणाले की, वैद्य सरांच्या कन्येने मनोगतात सांगितल्याप्रमाणे त्यांनी शिक्षणाबरोबरच माणुसकी, संस्कार आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे धडे दिले. हेच खऱ्या अर्थाने शिक्षण असून संस्थेच्या ध्येयधोरणांनुसार वैद्य सरांनी आपले कर्तव्य यशस्वीपणे पार पाडले.

कार्यक्रमाचे स्वागत संभाजी वैद्य यांनी केले. प्रास्ताविक सुनील जाधव यांनी केले. सूत्रसंचालन रामदास कासार यांनी तर लक्ष्मणराव वैद्य यांनी आभार मानले.

## श्री सद्गुरु गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स आणि संजीवनी कॉमर्स

# महाविद्यालयातील सहा विद्यार्थ्यांची रिसर्च असोसिएट पदासाठी निवड

**कोपरगाव । वीरभूमी–**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री सद्गुरु गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स आणि संजीवनी कॉमर्स महाविद्यालय, कोपरगाव येथील रसायनशास्त्र विभाग, प्लेसमेंट सेल आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) यांच्या संयुक्त विद्यमाने कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमात किनोमेरा बायोसायन्सेस प्रा. लि., मुंबई या नामांकित कंपनीच्या सहकार्याने विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हमधून पदव्युत्तरऑर्गनिक केमिस्ट्रीच्या वैभव काजळे, बबन पावळे, गणेश भोसले, अमित मापारी, राहुल आहेर आणि प्रशांत निकम या विद्यार्थ्यांची रिसर्च असोसिएट पदासाठी निवड करण्यात आली.

कंपनीच्या वतीने डॉ. ज्ञानेश्वर पाचरणे यांनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या.या विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे व्हा. चेअरमन व महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ॲड. संदीप वर्पे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य, मा. सौ चैतालीताई काळे, मा. आमदार विवेक कोल्हे, मा. श्री सुनील गंगुले, मा. श्री बाळासाहेब आव्हाड, कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. बंडेराव तऱ्हाळ, विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ. घनश्याम भगत, वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य डॉ. अर्जुन भागवत, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. दिलीप भोये, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ.प्रतिभा रांधवणे, डॉ. विलास गाडे, कार्यालय अधीक्षक श्री. सुनील गोसावी तसेच सर्व विभाग प्रमुख यांनी निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.



# घाटघर रोपवेने अकोल्याच्या पर्यटनाला मिळू शकते नवी उभारी

## २१ वर्षांपूर्वी अपघातानंतर रखडलेला प्रकल्प पुन्हा मार्गी लागल्यास मुंबई-ठाणे पर्यटकांसाठी ठरेल मोठे आकर्षण

**● अकोले । वीरभूमी-**
अकोले तालुक्यातील घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्पात झालेल्या अपघातानंतर मागील २१ वर्षांपासून बासनात पडलेल्या घाटघर रोपवे प्रकल्पाचा नव्याने विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. हा रोपवे साकार झाल्यास अकोल्याच्या पर्यटन क्षेत्राला नवी दिशा मिळू शकते. विशेषतः मुंबई व ठाणे परिसरातून येणाऱ्या पर्यटकांना डोळखांब (शहापूर) येथून आपल्या वाहनांसह थेट घाटघरच्या कोकणकड्यावर पोहोचता येईल.

अहिल्यानगर जिल्ह्याची 'चेरापुंजी' म्हणून ओळख असलेल्या घाटघर परिसराला निसर्गसौंदर्याचे अनोखे वरदान लाभले आहे. पावसाळ्यात तीन महिने हा संपूर्ण परिसर ढग, धुके आणि रिमझिम पावसात हरवून जातो. कोकणकडा, त्याच्या पायथ्याशी असलेली खोल दरी, त्यातून वर येणारे धुक्याचे लोट आणि टपोऱ्या थेंबांचा वर्षाव हे दृश्य पर्यटकांना अक्षरशः मंत्रमुग्ध करते. त्यामुळे दरवर्षी हजारो पर्यटक घाटघरला भेट देतात. पावसाळ्यानंतरही येथील निसर्ग अनुभवण्यासाठी पर्यटकांची गर्दी कायम असते. प्रसिद्ध सांदण दरीही घाटघरच्या जवळच आहे.

घाटघर प्रकल्पाचे काम सुरू असताना कोकणकड्याजवळ रोपवे उभारण्याचा प्रस्ताव पुढे आला होता. या प्रकल्पात दोन स्वतंत्र केबिन प्रस्तावित करण्यात आल्या होत्या. एका केबिनमधून प्रवाशांची वाहतूक तर दुसऱ्या केबिनमधून जीप, कारसारखी छोटी वाहने नेण्याची सुविधा उपलब्ध होणार होती. मात्र काही कारणांमुळे हा प्रस्ताव रखडला. आजच्या घडीला पर्यटन विकासाच्या दृष्टीने या प्रकल्पाचा पुनर्विचार होणे आवश्यक मानले जात आहे.

मुंबई परिसरातून भंडारदरा-घाटघर भागात येणाऱ्या पर्यटकांसाठी हा रोपवे विशेष आकर्षण ठरू शकतो. मुंबईहून शहापूरमार्गे डोळखांब येथे पोहोचल्यानंतर पर्यटकांना अवघ्या पाच मिनिटांत रोपवेद्वारे थेट कोकणकड्याच्या माथ्यावर घाटघरला जाता आले असते. कळसूबाई शिखर, रतनगड, सांदण दरी, भंडारदरा धरण आणि पावसाळ्यात डोंगरकड्यांवरून कोसळणारे असंख्य धबधबे पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांसाठी हा प्रकल्प मोठे आकर्षण ठरू शकतो.

या रोपवेच्या माध्यमातून घाटघर परिसरातील आदिवासी तरुणांसाठी पर्यटनाधारित रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात. तसेच स्थानिकांना ठाणे आणि मुंबईकडे जाण्यासाठी अधिक जवळचा आणि सोयीस्कर मार्ग उपलब्ध होईल. त्यामुळे अकोले तालुक्याच्या पर्यटन विकासालाही मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे.

घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्पाचे काम सुरू असताना या रोपवेची संकल्पना पुढे आली होती. या प्रकल्पात घाटघर येथे प्रवरा नदीवर उर्ध्व धरण, तर ठाणे जिल्ह्यातील चोंडे (शहापूर) येथे शाई नदीवर निम्न धरण उभारण्यात आले. तसेच घाटघरच्या कोकणकड्याजवळ डोंगराच्या पोटात भुयारांमध्ये विद्युतगृहाचे काम सुरू होते.

घाटघर आणि चोंडे यांच्यात सुमारे ४७० मीटर उंचीचा फरक आहे. सध्याच्या रस्तामार्गाने हे अंतर सुमारे १०० किलोमीटर आहे. रोपवे झाल्यास हे अंतर मोठ्या प्रमाणात कमी झाले असते. याच कारणामुळे रोपवेचा पर्याय पुढे आला होता. एका खाजगी कंपनीमार्फत या प्रकल्पाचा आराखडाही तयार करण्यात आला होता. प्रवाशांसाठी आणि मालवाहतुकीसाठी प्रत्येकी एक अशा दोन स्वतंत्र केबिन प्रस्तावित होत्या. प्रवासी केबिनची क्षमता २० व्यक्तींची होती, तर मालवाहतूक केबिनमधून जीप, कारसारखी वाहने नेण्याची सुविधा उपलब्ध होणार होती. या केबिनची वाहतूक क्षमता सुमारे ५ हजार किलो इतकी प्रस्तावित होती. या प्रकल्पाला मंजुरीदेखील मिळाली होती.



मात्र, जून २००५ मध्ये कोकणकड्यावरील मोठी दरड कोसळून घाटघर प्रकल्पात भीषण अपघात झाला. निम्न धरणातील पाणी, दरडीचा मलबा, दगड-गोटे प्रकल्पाच्या बोगद्यात शिरल्याने मोठे नुकसान झाले. या दुर्घटनेत बोगद्यात काम करणाऱ्या काही कामगारांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर रोपवेचा प्रस्ताव कायमचा रखडला.

विशेष म्हणजे, मागील २१ वर्षांत घाटघर परिसरात पुन्हा अशा प्रकारची मोठी दरड कोसळण्याची घटना घडलेली नाही. २००५ मधील दुर्घटना सलग तीन दिवस झालेल्या अतिवृष्टीमुळे घडली होती. त्यावेळी कड्याच्या उतारावरील माती, मुरूम, झाडे आणि खडकाचा काही भाग दरीत कोसळला होता. अपवादात्मक परिस्थितीत घडलेल्या या घटनेच्या आधारावर घाटघर रोपवेच्या संकल्पनेवर कायमची फुली मारण्याऐवजी पर्यटन वाढ आणि स्थानिक विकासाच्या दृष्टीने त्याचा नव्याने गांभीर्याने विचार होणे आवश्यक असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# सासरच्या जाचाला कंटाळून जावयाची आत्महत्या

## सासरच्या मंडळींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची वडीलांची मागणी

**● पाथर्डी । वीरभूमी-**
तालुक्यातील खरवंडी परिसरातील एका तरुणाच्या मृत्यूप्रकरणी त्याच्या वडिलांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, मुलाच्या सासरच्या मंडळींकडून होत असलेल्या कथित मानसिक त्रास, धमक्या आणि कौटुंबिक वादामुळे हा प्रकार घडल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, मृत तरुणाचा विवाह काही वर्षांपूर्वी जिल्ह्यातील मिरजगाव येथे झाला होता. विवाहानंतर पती-पत्नीमध्ये तसेच दोन्ही कुटुंबांमध्ये वेळोवेळी वाद निर्माण होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. संबंधित तरुणाने आपल्या वडिलांकडे सासरच्या व्यक्तींकडून मानसिक त्रास दिला जात असल्याची अनेकदा व्यथा मांडल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे.

तक्रारीत असेही म्हटले आहे की, काही दिवसांपूर्वी संबंधित तरुणाची पत्नी गरोदर असल्याने उपचारासाठी माहेरी गेली होती. त्यानंतर दोन्ही कुटुंबांमध्ये वाद वाढले. याच पार्श्वभूमीवर तरुणाला मानसिक तणावाचा सामना करावा लागत असल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. दरम्यान, ३० मे रोजी संबंधित तरुणाने विष प्राशन केल्याने त्याची प्रकृती बिघडल्याने त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला. मृत्यूची माहिती मिळाल्यानंतर कुटुंबीयांनी या घटनेबाबत संशय व्यक्त करत पोलीस ठाण्यात धाव घेतली.

मृताच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीत मुलाच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याचा आरोप सासरच्या काही व्यक्तींवर केला असून, संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पोलिसांनी तक्रार स्वीकारून प्रकरणाची नोंद घेतली असून, घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

पोलीस तपास पूर्ण करुन सर्व बाबींची शहानिशा करून पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले.

# महिलेवर अत्याचार करणारा भोंदू बाबा अखेर जेरबंद, ३ जूनपर्यंत पोलीस कोठडी

**● पारनेर । वीरभूमी-**
बौद्धिक दिव्यांग मुलाचा आजार बरा करणे, शेतातील संकट दूर करणे आणि भावाचे लग्न जमवून देण्याचे आमिष दाखवून एका शेतकरी कुटुंबाची साडेसहा लाखांची फसवणूक करणाऱ्या व महिलेवर वारंवार लैंगिक अत्याचार करणाऱ्या मुख्य आरोपी भोंदू बाबाला पारनेर पोलिसांनी अखेर अटक केली आहे. राजू बन्सी दिवटे असे या भोंदू बाबाचे नाव असून, न्यायालयाने त्याला ३ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. यापूर्वीच त्याच्या मुलाला आणि एका महिला साथीदाराला पोलिसांनी गजाआड केले आहे.

पीडित शेतकरी महिलेचा मुलगा बौद्धिक दिव्यांग आहे. वैद्यकीय उपचार करूनही त्याच्यात सुधारणा होत नव्हती. तसेच शेतात पिके न येणे, डोक्यावरील कर्ज न फिटणे आणि भावाचे लग्न न जमणे अशा अनेक कौटुंबिक अडचणींमुळे हे कुटुंब हताश झाले होते. याच असहायतेचा फायदा आरोपी भोंदू बाबा राजू बन्सी दिवटे, त्याचा मुलगा शशिकांत राजू दिवटे आणि त्यांची महिला सहकारी शोभा अविनाश तरटे (रा. मसणे, ता. पारनेर) यांनी घेतला. अडचणी दूर करण्याचे आश्वासन देत त्यांनी या कुटुंबाकडून तब्बल ६ लाख ५० हजार रुपये उकळले.

पैसे उकळल्यानंतरही भोंदू बाबाची हाव मिटली नाही. तुझ्या दिव्यांग मुलाला देवी मारून टाकेल, अशी भीती त्याने पीडित महिलेला घातली. मुलाच्या जीवाचे बरेवाईट होईल या भीतीने महिला गप्प राहिली. याच भीतीचा गैरफायदा घेत भोंदू बाबाने पीडितेवर वारंवार लैंगिक अत्याचार केले. शेवटी या जाचाला कंटाळून पीडित महिलेने आपल्या सासू-सासऱ्यांना घडलेला सर्व प्रकार सांगत धीर एकवटला आणि पारनेर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

गुन्हा दाखल होताच पारनेर पोलिसांनी तातडीने चक्र फिरवली. पोलिसांनी सुरुवातीला भोंदू बाबाचा मुलगा शशिकांत दिवटे आणि महिला मांत्रिक शोभा तरटे यांना अटक केली. मात्र, मुख्य आरोपी राजू दिवटे हा घटना घडल्यापासून फरार होता. त्याच्याकडे मोबाईल फोन नसल्यामुळे पोलिसांना त्याचा माग काढण्यात तांत्रिक अडचणी येत होत्या. अखेर पोलीस उपनिरीक्षक चांगदेव हंडाळ आणि त्यांच्या पथकाने अत्यंत शिताफीने सापळा रचून शुक्रवारी पहाटेच्या सुमारास भोंदू बाबा राजू दिवटे याला बेड्या ठोकल्या.मुख्य आरोपीला पारनेर न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला ३ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलीस कोठडीच्या काळात आरोपीने केलेले आर्थिक व्यवहार, फसवणुकीचे नेमके स्वरूप आणि पीडित महिलेला दिलेल्या धमक्यांबाबत पोलीस सखोल चौकशी करत आहेत.

# पाथर्डीतील नदीच्या पुनरुज्जीवनासाठी पत्रकार परिषदेचे निवेदन

## खोलीकरण, रुंदीकरण, गाळ उपसा आणि सांडपाणी रोखण्यासाठी तातडीच्या व कायमस्वरूपी उपाययोजनांची मागणी

**● पाथर्डी । वीरभूमी-**
पाथर्डी शहरातून वाहणाऱ्या नदीची दिवसेंदिवस बिकट होत चाललेली अवस्था लक्षात घेऊन पाथर्डी मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले. नदी पात्राची स्वच्छता, खोलीकरण, रुंदीकरण, गाळ उपसा, सांडपाणी रोखणे तसेच नदीकाठच्या धार्मिक स्थळांच्या परिसराचे सुशोभीकरण करण्यासह पुरनियंत्रणासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

### पत्रकार परिषदेच्या प्रमुख मागण्या

- नदी पात्राचे तातडीने खोलीकरण व रुंदीकरण.
- नदीतील गाळ, कचरा व राडारोडा हटविणे.
- नदीपात्रातील अतिक्रमणांवर कारवाई.
- शहरातील सांडपाणी नदीत जाणे बंद करणे.
- नदीकाठच्या मंदिर परिसराचे सुशोभीकरण.
- पुरनियंत्रणासाठी कायमस्वरूपी उपाययोजना.
- नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या संरक्षणासाठी दीर्घकालीन आराखडा तयार करणे.

निवेदनात म्हटले आहे की, गेल्या अनेक वर्षांपासून नदी खोलीकरण व रुंदीकरणाच्या नावाखाली किरकोळ स्वरूपाची कामे होत असली तरी प्रत्यक्षात नदीपात्रात मोठ्या प्रमाणात गाळ, राडारोडा, अतिक्रमणे आणि कचरा साचला आहे. त्यामुळे नदीचे मूळ स्वरूप नष्ट होत चालले असून तिची वहनक्षमता कमी झाली आहे.

दरवर्षी पावसाळ्यापूर्वी मर्यादित स्वरूपात साफसफाई आणि खोदकाम केले जाते. मात्र, त्यामुळे नदीची वहनक्षमता वाढण्याऐवजी परिस्थिती अधिक गंभीर होत असल्याचे पत्रकार परिषदेने नमूद केले आहे. अतिवृष्टी झाल्यास पाथर्डी शहराला पुराचा गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. मागील वर्षी झालेल्या अवकाळी पावसात विविध भागांतील पूल वाहून जाणे, नदीकाठच्या वस्त्यांमध्ये पाणी शिरणे आणि नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे अशा घटना घडल्या होत्या.

या पार्श्वभूमीवर नदीचे किमान पाच ते दहा फूट खोलीकरण तसेच आवश्यक ठिकाणी व्यापक रुंदीकरण करण्यात यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

शहरातील सांडपाणी थेट नदीपात्रात सोडले जात असल्याने नदीचे प्रदूषण



वाढत असून पर्यावरणीय समतोल बिघडत आहे. परिणामी नागरिकांच्या आरोग्याचाही प्रश्न गंभीर बनत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नदीकाठावरील रेणुका माता मंदिर, श्री खोलेश्वर मंदिर, हनुमान बागेतील हनुमान मंदिर, कसबा पेठेतील श्री शनी मंदिर, महादेव मंदिर, मारुती मंदिर, दत्त मंदिर तसेच सात आसरा आणि माऊली आई देवस्थान यांसारख्या ऐतिहासिक व धार्मिक स्थळांनाही पुरस्थितीत धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

भविष्यात कोणतीही नैसर्गिक आपत्ती ओढवू नये तसेच नागरिकांच्या जीवित व वित्तीय सुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाने त्वरित कार्यवाही करावी, अशी मागणी पत्रकार संघाने केली आहे.

निवेदन देताना पत्रकार राजेंद्र सावंत, उमेश मोरगावकर, अनिल साठे, अमोल कांकरिया, बाबासाहेब गर्जे, संदीप शेवाळे आदी उपस्थित होते.